प्रेषक :- मा प्रशासक तथा आयुक्त,भि.नि.श.महानगरपालिका

प्रति :- नगरसचिव, भि.नि.श. महानगरपालिका

विषय - जनसंपर्क विभागाकरीता अंदाजपत्रकीय पुनर्वीनियोजन प्रस्तावा बाबत.

प्रस्तावना,

उपरोक्त विषयान्वये सन २०२३-२०२४ या वर्षात जाहिरात प्रसिध्दी व इतर छपाई प्रसिध्दी खर्च या लेखा शिर्षाअंतर्गत मुळ अंदाजपत्रकात रु.१.५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माहे डिसेंबर अखेर पर्यंत रक्कम रु. १,४९,५८,४११/- इतका प्रत्यक्षात खर्च झालेला होता त्यानंतर २५ लाखाची व पुन्हा ३० लाखाची अशी एकुण ५५ लाखाची पुनर्वीनियोजन करुण घेण्यात आली होती त्यामध्ये वृत्तपत्र जाहिरातीची बिल व शासनाकडून शासन आपल्या दारी व विकसित भारत संकल्प यात्रा, तसेच अंतराष्ट्रीय तृणधान्य दिन, जागतीक क्षयरोग दिन असे मोठे योजनांची जनजागृती करिता होर्डींग, पोस्टर्स, स्टीकर्स, दवंडी देणे, खान-पान व्यवस्था इत्यांदी कामी खुप मोठ्या प्रमाणात खर्च झालेला आहे.त्यामुळे रक्कम रुपये १३,४७९/- इतकी तरतूद सध्या शिल्लक आहे.

या पुढे विकसित भारत संकल्प यात्रा टप्पा-२ करिता, अभय योजना, वर्तमान पत्रातील जाहिराती, स्वच्छ सर्वेक्षण कामी, पल्स पोलिओ, वैद्यकीय आरोग्य विभागाकडील विविध उपक्रमे, शासनाचे इतर कार्यक्रम इत्यादी कामी जनजागृती करिता बॅनर्स, पोस्टर्स, स्टीकर्स व इतक छपाई कामी वाढ झालेला खर्च व अन्य देयके देणेकामी सदरची रक्कम कमी पडणार आहे.तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांकः सीएटी/२०१७/ प्र क्र ०८/ इमा-२, दि.२९ जून २०१७ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार शासन निर्णय परिच्छेद क्र.१ मधील १.२ नुसार रु.३ लक्ष ते रु.५० लक्ष पर्यंतच्या किंमतीच्या कामासाठी जिल्हास्तरीय एका मराठी वृत्तपत्रात व राज्यस्तरीय एका मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सदर ई-निविदा नोटीस प्रसिध्द करण्यात यावी असे परिपत्रक आहे. या प्रमाणे विकास कामांच्या निवीदांच्या जाहिरात एक इंग्रजी, एक राज्यस्तरीय व एक जिल्हास्तरीय अन्य वर्तमान पत्रात देणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार मा.व.ज-२०१८/प्र.क्र.३४८/३४ दि. २० डिसेंबर २०१८ अन्वये सर्व वर्तमान पत्राच्या जाहिरातीच्या दरात दोन ते तिन पटीने वाढ झालेली आहे. सुधारीत दरवाढीमुळे जाहिरातीवरील खर्चात फ़ार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

वर्तमान पत्राची अंदाजे रु.२० लाख बिल येणे बाकी आहे. तसेच या पुढे विकसित भारत संकल्प यात्रा टप्पा-२ करिता, अभय योजना, वर्तमान पत्रातील जाहिराती, स्वच्छ सर्वेक्षण कामी, पल्स पोलिओ, वैद्यकीय आरोग्य विभागाकडील विविध उपक्रमे, शासनाचे इतर कार्यक्रम इत्यादी कामी जनजागृती करिता बॅनर्स, पोस्टर्स, स्टीकर्स व इतक छपाई याकामी रु.३५ लाख रुपये असे **एकुण ५५ लाख** इतकी रक्कम सन २०२३-२०२४ च्या मुळ अर्थसंकल्पीय तरतूद मध्ये पूर्नविनयोजन करणे आवश्यक आहे. पुढील दोन महीन्याकरीता तरतूद शिल्लक नसल्याने सन - २०२३-२०२४ च्या रक्कम रु.१.५० लाख या मुळ अंदाजपत्रकीय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम १०१ मुळ अर्थसंकल्प पुनर्वीनियोजन मा. स्थायी समितीच्या मान्यता मिळणेकामी आवश्यक आहे पण स्थायी समिती अस्तीत्वात नसल्याने त्याचे संपूर्ण अधिकारी पालिका प्रशासक यांना प्राप्त झालेले आहे. त्यानुसार अर्थसंकल्प पुनर्वीनियोजन प्रस्ताव मान्यतेस सविनय सादर.

**सोबत - नमुना क्र.१० नियम ३० (३) विवरण पत्र सादर करण्यात आलेले आहे.**

उप-आयुक्त (मुख्यालय)
भिवंडी नि.शहर महानगरपालिका

मा.प्रशासय तथा आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

ठराव क्र. ३४६                                दि. ९/०२/२०२४.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांकः प्रतिनि-२०२३/प्र.क्र.११९/नवी-१४, दि.०९/०६/२०२३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१ अ) तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवांडी नि. शहर महानगरपालिका, जनसंपर्क अधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार व उप आयुक्त (जनसंपर्क), लेखा व वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांनी शिफ़ारस केल्यानुसार निविदा नोटीस व इतर छपाई प्रसिध्दी खर्च याकामी अंदाजपत्रकीय निधी तरतुदीचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व लेखा संहिता-१९७१ मधील नियम ३० (३) अन्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रनुसार दर्शविल्या प्रमाणे निवडणूक या लेखा शिर्षक रु.१० कोटी तरतूद आहे. यामध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च रु. ३५,३६,५००/- इतका झालेला आहे. व रक्कम रु.९,६४,६३,४९०/- इतकी शिल्लक आहे. या शिल्लक रक्कमेतून रक्कम रु.५५,००,०००/- (रु. पंचावन्न लक्ष मात्र) निविदा नोटीस व इतर जाहिरात प्रसिध्दी खर्च लेखाशिर्षात वर्ग/पुनर्वीनियोजन करणे तसेच छपाई साहित्य (बॅनर्स, पोस्टर्स, स्टीकर्स, हस्तपत्रीका व इतर छपाई साहित्य) पुरविणेकामी होणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील ३० एम.एल.डी. मलप्रक्रिया केंद्राचे काम भुयारी गटार योजना टप्पा-२ अंतर्गत पुर्ण झालेले असुन मलशुद्धीकरण केंद्र प्राथमिक टप्प्यात कार्यान्वित करण्यांत आलेले आहे. तसेच ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपीग स्टेशन कार्यान्वित आहेत.

सद्यस्थितीत भुयारी गटार योजना टप्पा-२ चे ठेकेदार मे. ईगल इन्फ्रा. इंडीया लि. यांचे कडुन ट्रायल ॲण्ड रन तत्वावर काम करुन घेण्यांत येत होते. परंतु त्याची मुदत ६ महिने असुन ती संपलेली आहे.

सदरचे मलशुद्धीकरण केंद्र १ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून कार्यान्वित आहे. सदर मलशुद्धीकरण केंद्र चालविणे करीता मनपा आस्थापनेवर सदर बाबतचे तांत्रिक ज्ञान असलेले कर्मचारी उपलब्ध नाहीत. मलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित ठेवणे कामी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे वेळोवेळी मलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित आहे किंवा नाही याबाबत पहाणी होत असते. तसेच मलशुद्धीकरण कार्यान्वित नसल्याचे आढळल्यास त्यांचे कडुन दंडात्मक व फौजदारी स्वरुपाची कारवाई होऊ शकते. त्याकरीता मनुष्यबळासहित देखभाल, निगा व दुरुस्ती करणेचे काम अत्यावश्यक आहे.

तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या शेजारी असणाऱ्या महानगरपालिकांकडून माहिती घेतली असता सदर महानगरपालिकांच्या क्लोरिनेशन प्लॅन्टची निगा, दुरुस्ती व वार्षिक देखभाल खाजगी ठेकेदारांमार्फत काम करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | **रु.१,१९,१३,५४४/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) ई-निविदा मागविणे कामी प्रशासकिय मान्यता तसेच आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली असुन महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करणे कामी करुन पुढील कार्यवाही करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** 380 **दिनांक :** 09/02/ **२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) ₹१,१९,१३,४६९/- मात्रच्या प्रस्तावांची ई-निविदा मागविणे कामी प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव प्र. कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) ₹१,१९,१३,४६९/- मात्रच्या प्रस्तावाची ई-निविदा महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करुन पुढील कार्यवाही करणेकामी मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

| प्रभाग समिती क्र.५ | | | | |
|---|---|---|---|---|
| मनपाच्या वाहनांसाठी वाहन चालक, इंधन व मजूर (अ) | | | | |
| वाहनाचा प्रकार | डिझेल खर्च (४ लि.) | वाहन चालक खर्च | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी १२ (१०+२) | १३२९८४ | २८६८७२ | २५६६९२ | ६७६५४८ |
| आर सी ५ (४+१) | १,८७,००८.७५ | ११९५३० | २१३९१० | ५२०४४८.७५ |
| जेसीबी १ | २२१६४० | २३९०६ | ------ | २४५५४६ |
| | ५४१६३२.७५ | ४३०३०८ | | **१४४२५४२.७५** |

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर (ब) | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | वाहनाचा मासिक खर्च (मनपा कर व १८ टक्के GST) | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी ९ | ८१९५९८.५ | १९२५१९ | १०१२११७.५ |
| टिप्पर (डंपर) ४ | ४०८८७० | ----- | ४०८८७० |
| जेसीबी २ | ७५६४८३.६ | ------ | ७५६४८३.६ |
| ट्रक्टर १ | ११८३४९.१ | ४२७८२ | १६११३१.१ |
| | | | **२३३८६०२.२** |
| | एकुण अ व ब | | **३७८११४५** |

| राखीव वाहन चालक संख्या | मासिक वेतन | एकुण खर्च |
|---|---|---|
| १० | २३,९०६ | २,३९,०६०/- |

प्रभाग समिती निहाय खर्चाचा एकुण तपशील खालील प्रमाणे आहे.

| प्रभाग समिती क्र. | मनपाच्या वाहनांचा व वाहनचालक व इंधनाचा खर्च | भाडेतत्वावरील वाहनांचा व मजूरांचा खर्च | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.१ | **१५४६६३२.५** | **२१७७४७१.१** | **३७२४१०३.६** |
| प्रभाग समिती क्र.२ | **१३०१०८६.५** | **२३३८६०२.२** | **३६३९६८८.७** |
| प्रभाग समिती क्र.३ | **१३०१०८६.५** | **२१७७४७१.१** | **३४७८५५७.६** |
| प्रभाग समिती क्र.४ | **११९६९९६.७५** | **२१७७४७१.१** | **३३७४४६७.८५** |
| प्रभाग समिती क्र.५ | **१४४२५४२.७५** | **२३३८६०२.२** | **३७८११४५** |
| प्रभाग समिती क्र.१ ते ५ साठी राखीव वाहन चालकांचा खर्च | **मासिक वेतन** | **२३,९०६** | **२,३९,०६०** |
| एकुण खर्च | | | **१,८२,३७,०२२.७५** |

वरिल तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता यापुर्वी विभागाने प्रस्तावित केलेल्या खर्च रक्कम रु.१,४७,०७,५०९/- इतका व सुधारीत खर्च रक्कम रु.१,८२,३७,०२२.७५ इतका येत असल्याने रु.३५,२९,५१३.७५ इतक्या खर्चात वाढ झाली आहे.

सुधारित रक्कम रु.१,८२,३७,०२२.७५ होणारा खर्च हा सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी पुर्नविनियोजनास दिलेल्या मंजुरी मधुल प्रस्तावित करण्यात येत असुन सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील घनकचरा व्यवस्थापना कामी मंजुर असलेल्या तरतुद निधी मधुन उर्वरित खर्च करणेचे असल्याने एकुण ६ महिन्याच्या कालावधी किंवा नविन निविदा अंतिम होईपर्यत मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी.

**प्रशासकिय ठराव क्र.** ३८८ **दि.** ०९/ ०२ **/२०२४**

घनकचरा व्यवस्थापना कामी मे.आर.ॲण्ड.बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.बोरिवली, मुंबई यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने मनपाकडुन दिलेल्या अंतीम नोटीसचा कोणत्याही प्रकारचा लेखी खुलासा सादर न केल्याने संबंधितांस बजावण्यात आलेल्या नोटीस मधील नमुद कालावधी संपुष्टात आले नंतर मे.आर. ॲण्ड.बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.बोरिवली, मुंबई यांचे

सोबत झालेला करारनामा रद्द करुन अत्यंत तातडीचे व निकडीची बाब म्हणुन मनपाची मालकीची वाहने उक्त वाहनांवर वाहनविभागाकडील मंजुर निविदे प्रमाणे वाहनचालक घेणे तसेच अतिरिक्त असलेले आवश्यक संख्ये मध्ये वाहने भाडेतत्वावर घेणेसाठी अंदाजे दरमहा रु.१,४७,०७,५०९/- इतक्या खर्च व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी खर्च पुर्नविनियोजनास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी प्रशासकिय ठराव क्र.३३०, दि.१९/०१/२०२४ नुसार मंजूरी प्राप्त झाली होती.त्यानुसार सुधारित रक्कम रु.१,८२,३७,०२२.७५ इतका असल्याने यापुर्वी पुर्नविनियोजन मधुन खर्चास मान्यते त्याच प्रमाणे प्रभाग समिती निहाय निविदा मागविणेसाठी व नविन निविदा अंतीम होईपर्यत मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे कामी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापना कामी मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने व मनपा कडुन दिलेल्या अंतीम नोटीसचा कोणत्याही प्रकारचा लेखी खुलासा सादर न केल्याने संबंधितांस बजावण्यात आलेल्या अंतिम नोटीसचा ६० दिवसाचा कालावधी दि.०८/०२/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने **दि.०८/०२/२०२४ रोजी मे. आर. ॲण्ड. बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई यांचे सोबत झालेल्या चर्चे अंती दि.०१/०३/२०२४ रोजी पासुन घनकचरा संकलन व वहन करणेचे काम बंद करणार असल्याने** अत्यंत तातडीचे व निकडीची बाब म्हणुन मनपा तर्फे पुरविण्यात आलेल्या मनपाची मालकीची वाहने उक्त वाहनांवर वाहन विभागाकडील मंजुर निविदे प्रमाणे आवश्यक संख्ये मध्ये वाहनचालक घेणे तसेच अतिरिक्त असलेले आवश्यक संख्ये मध्ये वाहने भाडेतत्वावर घेणेसाठी अंदाजे सुधारित दरमहा रु.१,८२,३७,०२४/- एवढा खर्च येत असल्याने प्रभाग निहाय मासिक तत्वावर पुढील निविदा प्रक्रिया अंतिम होई पर्यत अथवा पर्यायी व्यवस्था होई पर्यंतच्या कालावधी पर्यंत तसेच आवश्यकते नुसार बदल करणे कामी अधिकार राखुन ठेवुन दरमहा येणा-या खर्चास व उक्त कामा करिता सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी खर्च पुर्नविनियोजनास तसेच पुढील खर्च सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील घनकचरा व्यवस्थापना कामी मंजुर असलेल्या तरतुद निधी मधुन उर्वरित खर्च करणे **यासाठी उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेत येत आहे.**

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

O/C

**प्रस्तावना :- घनकचरा व्यवस्थापना कामी प्रभाग समिती निहाय आवश्यक वाहने भाडेतत्वावर घेणे कामी सहा महिन्याच्या होणा-या सुधारित खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

मे.सविनय़ सादर,

घनकचरा व्यवस्थापन ठेकेदार मे.आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई या ठेकेदार संस्थेचे घनकचरा व्यवस्थापन कामाचे माहे सप्टेंबर २०२३ चे रु.१,८५,५५,६३९/- इतके देयक प्रस्तावित करण्यात आले असुन माहे ऑक्टोबर २०२३, माहे नोव्हेंबर २०२३ व माहे डिसेंबर २०२३ चे देयक अदा करणेचे बाकी असुन ठेकेदारा मार्फत दरमहा अंदाजे १.५० कोटी ते २ कोटी पर्यंत मासिक देयक सादर केले जातात.उक्त ठेकेदार यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने आरोग्य विभागा मार्फत जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१६०४,दि.११/१२/२०२३ रोजी ६० दिवसांची अंतीम नोटीस बजावण्यात आली असुन ठेकेदाराच्या कामात सुधारणा आढळुन येत नसल्याने माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणुक आचारसहिंता लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने व ठेकेदार यांचे कामात सुधारणा होत नसल्याने स्थानिक नागरिकांचे आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल याकरिता मनपा मालकीच्या घंटागाडी व आर.सी.गाडी यांचा वापर करुन मनपाच्या वाहन विभागाकडील मंजुर दरानुसार, मंजुर ठेकेदाराकडुन ड्रायव्हर उपलब्ध करुन मनपा मार्फत इंधन पुरवठा करुन कचरा संकलनाचे काम करणेचे व अतिरिक्त वाहने आवश्यतेनुसार मासिक भाड्याने घेवुन त्याआधारे काम पुर्ण करणेसाठी यापुर्वी विभागाने प्रस्तावित केलेल्या खर्च रक्कम रु.१,४७,०७,५०९/- इतक्या खर्चास व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी खर्च पुनर्विनियोजनास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी प्रशासकिय ठराव क्र.३३० दि.१९/०१/२०२४ नुसार मंजूरी प्राप्त झाली होती.

परंतु भाडेत्वावर घेण्यात आलेल्या वाहनावर मनपाच्या आस्थापनावर कार्यरत असलेले सफाई कर्मचारी घेण्यात आले होती.प्राप्त निर्देशानुसार आस्थापनेवरील सफाई कर्मचारी भाडेतत्वावर वाहनावर घेतल्यास शहरातील स्वच्छता विषयक कामावर परिणाम होणार असल्याने याकामी मनपाच्या आस्थापनेवरील सफाई कर्मचारी न घेता मेहनताना तत्वावर मजुर घेणचे सुचना प्राप्त झाले होते.त्यानुसार खालील प्रमाणे सुधारित खर्चस प्रभाग समिती निहाय सादर करण्यात येत आहे.

मनपाकडील वाहंनाचा खर्चाचा तपशील व भाडेतत्वावर घेण्यात येणा-या वाहना करिता खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| प्रभाग समिती क्र.१ | | | | |
|---|---|---|---|---|
| मनपाच्या वाहनांसाठी वाहन चालक, इंधन व मजूर (अ) | | | | |
| वाहनाचा प्रकार | डिझेल खर्च (४ लि.) | वाहन चालक खर्च | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी १२ (१०+२) | १३२९८४ | २८६८७२ | २५६६९२ | ६७६५४८ |
| आर सी ६ (५+१) | २२४४१०.५ | १४३४३६ | २५६६९२ | ६२४५३८.५ |
| जेसीबी १ | २२१६४० | २३९०६ | ------ | २४५५४६ |
| | ५७९०३४.५ | ४५४२१४ | | **१५४६६३२.५** |

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर (ब) | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | वाहनाचा मासिक खर्च (मनपा कर व १८ टक्के व्र्क्च्) | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी ९ | ८१९५९८.५ | १९२५१९ | १०१२११७.५ |
| टिप्पर (डंपर) ४ | ४०८८७० | ----- | ४०८८७० |
| जेसीबी २ | ७५६४८३.६ | ------ | ७५६४८३.६ |
| | | | २१७७४७१.१ |
| | एकुण अ व ब | | **३७२४१०३.६** |

| प्रभाग समिती क्र.२ | | | | |
|---|---|---|---|---|
| मनपाच्या वाहनांसाठी वाहन चालक, इंधन व मजूर (अ) | | | | |
| वाहनाचा प्रकार | डिझेल खर्च (४ लि.) | वाहन चालक खर्च | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी १२ | १३२९८४ | २८६८७२ | २५६६९२ | ६७६५४८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१०+२) | | | | |
| आर सी ६ (५+१) | २२४४१०.५ | १४३४३६ | २५६६९२ | ६२४५३८.५ |
| | ३५७३९४.५ | ४३०३०८ | | **१३०१०८६.५** |

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर (ब) | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | वाहनाचा मासिक खर्च (मनपा कर व १८ टक्के GST) | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी ९ | ८१९५९८.५ | १९२५१९ | १०१२११७.५ |
| टिप्पर (डंपर) ४ | ४०८८७० | ----- | ४०८८७० |
| जेसीबी २ | ७५६४८३.६ | ------ | ७,५६,४८४ |
| ट्रक्टर १ | ११८३४९.१ | ४२७८२ | १६११३१.१ |
| | | | **२३३८६०२.२** |
| | एकुण अ व ब | | **३६३९६८८.७** |

| प्रभाग समिती क्र.३ | | | | |
|---|---|---|---|---|
| मनपाच्या वाहनांसाठी वाहन चालक, इंधन व मजूर (अ) | | | | |
| वाहनाचा प्रकार | डिझेल खर्च (४ लि.) | वाहन चालक खर्च | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी १२ (१०+२) | १३२९८४ | २८६८७२ | २५६६९२ | ६७६५४८ |
| आर सी ६ (५+१) | २,२४,४१०.५ | १४३४३६ | २५६६९२ | ६२४५३८.५ |
| | ३५७३९४.५ | ४३०३०८ | | **१३०१०८६.५** |

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर (ब) | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | वाहनाचा मासिक खर्च (मनपा कर व १८ टक्के GST) | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी ९ | ८१९५९८.५ | १९२५१९ | १०१२११७.५ |
| टिप्पर (डंपर) ४ | ४०८८७० | ----- | ४०८८७० |
| जेसीबी २ | ७५६४८३.६ | ------ | ७५६४८३.६ |
| | | | **२१७७४७१.१** |
| | एकुण अ व ब | | **३४७८५५७.६** |

| प्रभाग समिती क्र.४ | | | | |
|---|---|---|---|---|
| मनपाच्या वाहनांसाठी वाहन चालक, इंधन व मजूर (अ) | | | | |
| वाहनाचा प्रकार | डिझेल खर्च (४ लि.) | वाहन चालक खर्च | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी १२ (१०+२) | १३२९८४ | २८६८७२ | २५६६९२ | ६७६५४८ |
| आर सी ५ (४+१) | १,८७,००८.७५ | ११९५३० | २१३९१० | ५२०४४८.७५ |
| | ३१९९९२.७५ | ४०६४०२ | | **११९६९९६.७५** |

| भाडेतत्वावर घेण्यात येणाया साधन सामुग्रीसाठी (वाहने) वाहन चालक व इंधनासह व मजूर (ब) | | | |
|---|---|---|---|
| वाहनाचा प्रकार | वाहनाचा मासिक खर्च (मनपा कर व १८ टक्के GST) | मजूराचा खर्च | एकुण खर्च |
| घंटागाडी ९ | ८१९५९८.५ | १९२५१९ | १०१२११७.५ |
| टिप्पर (डंपर) ४ | ४०८८७० | ----- | ४०८८७० |
| जेसीबी २ | ७५६४८३.६ | ------ | ७५६४८३.६ |
| | | | **२१७७४७१.१** |
| | एकुण अ व ब | | **३३७४४६७.८५** |

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :- भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.2 प्र.क्र.12 येथील न्युआझादनगर येथे सभागृह बनविणे.**

भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ प्र.क्र.१२ येथील न्युआझादनगर येथे सभागृह बनविणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९७,८२५/- मात्रच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक १०/०८/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन त्यानुसार क्र./नवि/टे-४/भिनिशमनपा/मुलभुत/प्र.मा/एस.आर-२३९/२०२३ दि.२६/१०/२०२३ नुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,यांचे कडुन प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४९,९७,८२५/- ई-निविदा सुचना क्र.११२/२०२३-२४ (९६०२४१) दि.०३/११/२०२३ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.१६/११/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.मानसी कन्स्ट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५० % कमी दराने** |
| २ | मे.चंडीका कन्स्ट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१० % जादा दराने** |

वरील पैकी **मे.मानसी कन्स्ट्रक्शन**, यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.५० % कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४९,२२,८५८/- (अक्षरी एकोणपन्नास लाख बावीस हजार आठशे अठ्ठावन मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ३४९ दिनांक :- १३/०२/२०२४

मे.मानसी कन्स्ट्रक्शन, यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.५० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.४९,२२,८५८/- (अक्षरी एकोणपन्नास लाख बावीस हजार आठशे अठ्ठावन मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.2 प्र.क्र.12 येथील न्युआझादनगर येथे सभागृह बनविणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.मानसी कन्स्ट्रक्शन, यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :- भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.2 प्र.क्र.14 येथील बिलालनगर येथे सभागृह बनविणे.**

भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ प्र.क्र.१४ येथील बिलालनगर येथे सभागृह बनविणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५४,९७,९०३/- मात्रच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक १०/०८/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन त्यानुसार क्र./नवि/टे-४/भिनिशमनपा/मुलभुत/प्र.मा/एस.आर-२३९/२०२३ दि.२६/१०/२०२३ नुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,यांचे कडुन प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ५४,९७,९०३/- ई-निविदा सुचना क्र.१३२/२०२३-२४ (९७४५४१) दि.२२/१२/२०२३ रोजी दैनिक प्रातकाळ टाईम्स,दै.हिंदुस्तान टाईम्स वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.२७/१२/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.मानसी कन्स्ट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६० % कमी दराने** |
| २ | मे.पुर्वी इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३ % जादा दराने |

वरील पैकी **मे.मानसी कन्स्ट्रक्शन**, यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.६० % कमी दराची म्हणजेच रक्कम रु.५४,६४,९१५/- (अक्षरी चोपन्न लाख चौसष्ट हजार नऊशे पंधरा मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दिनांक :- १३/०२/२०२४

ठराव क्र.:- ३५०

मे.मानसी कन्स्ट्रक्शन, यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.६० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.५४,६४,९१५/- (अक्षरी चोपन्न लाख चौसष्ट हजार नऊशे पंधरा मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ प्र.क्र.१४ येथील बिलालनगर येथे सभागृह बनविणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे.मानसी कन्स्ट्रक्शन**, यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका